Final

# पेशवा

# थोरला माधवराव

शं. श्री. पुराणिक

- प्रकाशक
  **छाया प्रकाशन**
  ३६, न्यू आनंदनगर,
  तळेगाव (दाभाडे) – ४१०५०६



- **प्रा. श. श्री. पुराणिक**
  फ्लॅट क्र. २, 'लोटस एन्क्लेव्ह',
  ९८, आनंद पार्क, औंध, पुणे ४११००७.
  दूरध्वनी : ०२०–२५८९६१३८



- **अक्षरजुळणी व मुद्रक**
  प्रतिमा ऑफसेट
  १ बी, देवगिरी इस्टेट, सर्व्हे नं. १७/१ बी,
  प्लॉट नं.१४, कोथरूड इंडस्ट्रियल एरिया,
  कोथरूड, पुणे – ४११०३८.

- **प्रकाशन दिनांक**
  विजयादशमी : ११ ऑक्टोबर २०१६

- किंमत : १५०/–


# *अर्पण पत्रिका*

***चि. प्रणव याच्या बाललीलांस***

– ✻ –

# प्रस्तावना

## चाळीस वर्षांचा संकल्प

१९६३ साली वाई येथील कॉलेजात मी प्राध्यापक असताना, राहून राहून माझ्या मनात कल्पना येई की, मराठ्यांचा इतिहास आहे, पण तो इतिहास घडविणाऱ्या व्यक्तींची त्यांच्या गुणदोषांसह यथार्थपणे रेखाटलेली चरित्रे मराठी वाङ्मयात नाहीत. इंग्रजी वाङ्मयातली लिटन स्ट्रॅची, आन्द्रे मॉर्वा, एमिल लुडविग व स्टीफन स्वाइग यांनी लिहिलेली, 'नेपोलियन', 'मेरी अॅन्टॉनिएट', 'डिझरेली', 'व्हिक्टोरिया' ही चरित्रे वाचल्यावर तर मराठीतील ही उणीव मला विशेष तीव्रतेने भासू लागली. त्यावेळी मी निश्चय केला की, मराठी इतिहासातील शिवछत्रपतींपासून दुसऱ्या बाजीराव पेशव्यापर्यंतची चरित्रे आपण लिहावी.

तो संकल्प त्यानंतर अठरा वर्षांनी फळास आला. त्यावर्षी मी मराठ्यांचे स्वातंत्र्यसमर (पूर्वार्ध– छत्रपति संभाजी) व (उत्तरार्ध– छत्रपति राजाराम व ताराबाई) हा ग्रंथ लिहिला. तो इतिहास असला तरी त्यात प्राधान्य संभाजी, राजाराम व ताराबाई या व्यक्तिरेखांनाच आहे. त्यानंतर १९९८ मध्ये मी 'पेशवा पहिला बाजीराव – पूर्वार्ध व उत्तरार्ध' व 'तुळाजी आंग्रे – एक विजयदुर्ग' (२०००) ही चरित्रे लिहिली. त्यानंतर 'पेशवा बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब', 'रघुजी भोसले', 'पानिपत एक महाभारत' लिहिले. त्यानंतर 'पेशवा थोरला माधवराव' हे लिहिले. यापुढे 'नाना फडणीस', 'महादजी शिंदे' व 'पेशवा दुसरा बाजीराव' ही चरित्रे लिहून झाली की चाळीस वर्षांचा हा संकल्प सिद्धीस गेल्याचे समाधान मला मिळेल – ही चरित्रे अद्याप प्रसिद्ध व्हावयाची आहेत. पण मी असा विचार केला की आपल्या हातात आहे तेवढे तरी करावे. ती प्रसिद्ध होणे हे दैवाधीन किंवा योगायोगावर किंवा ईश्वरीकृपेवर आहे. आपल्या हातून झाले ते काम केले हे समाधान काही कमी नाही, ते केल्याने या पूर्वजांच्या ऋणातून तरी आपण मुक्त होऊ.

## यथार्थ व्यक्तिदर्शन हे सूत्र

ही चरित्रे लिहिताना ती केवळ गुणदर्शन घडवणारी व दोष झाकून ठेवणारी

एकतर्फी व्यक्तीविजयाची पोथी होऊ नये अशी दक्षता मी बाळगली आहे. इतिहासात कोणताही माणूस सर्वस्वी गुणी नसतो वा दुर्गुणी नसतो. पहिल्या बाजीरावातही अनेक दोष होते व दुसऱ्या बाजीरावातही अनेक गुण होते व पेशवाईला कितीही नावे ठेवली तरी ती शंभर वर्षे टिकली यावरूनच तिच्यात अनेक चांगले गुण निर्विवाद होते हे गुणदोषांचे अवधान ठेवले तरच यथार्थ व्यक्तिदर्शन साधते असे मला वाटते.

### साधनांचे तारतम्य

थोरल्या माधवरावाचे हे चरित्र लिहिताना मी रा. सहस्त्रबुद्धे यांचे 'थोरले माधवराव पेशवे' व सरदेसायांची मराठी रियासत मध्य विभाग ४– याच ग्रंथांचा प्रामुख्याने उपयोग केलेला आहे. त्यातली माहिती मी घेतली आहे पण निवेदन व मांडणी सर्वस्वी माझी स्वतःची आहे. उतारेच्या उतारे घेणे म्हणजे चरित्र नव्हे किंवा इतिहास नव्हे. त्यांच्या आधारे केलेले निवेदन हेच चरित्र आहे व या रचनेतच 'चातुर्य सारे रचनेत आहे!' या न्यायाने रचना–चातुर्य दिसून येते. उतारे बहुतेक सर्व थोरल्या माधवरावाच्या पत्रातले आहेत कारण पत्रव्यवहार हे व्यक्तिदर्शनाचे सर्वांना अस्सल आणि सर्वात अमोघ साधन आहे.

### कादंबऱ्या वापरल्या नाहीत

थोरल्या माधवरावाच्या जीवनावर कादंबरी व ती मराठीत अशी नाहीच. फक्त एक रणजित देसाई यांची 'स्वामी' ही आहे. ती मी वापरली नाही – कारण तिच्यातला दोष रणजित देसाईनीच एकदा बोलून दाखवला होता. ते म्हणाले की, 'लोक ती कादंबरी थोरल्या माधवरावांचे चरित्र म्हणून न वाचता रमामाधवांची प्रेमकथा म्हणून वाचतात'. हा दोष वाचकांचा नसून लेखकाचा आहे. कारण इतिहासात काय किंवा रमामाधवांच्या स्वभाव रचनेत काय, या प्रेमकथेला कसलाही आधार नाही. नवरा–बायकोच्या ऐतिहासिक स्वभावावर आधारलेले संवाद पाहायचेच असतील तर 'मध्याह्न' या हरिभाऊंच्या कादंबऱ्यातील पहिल्या दोन प्रकरणात दिलेले आनंदीबाई व राघोबादादा यांचे संवाद पहावेत. हरिभाऊंच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या तोडीची एकही कादंबरी माझ्या पाहण्यात नाही. या आजकालच्या तथाकथित ऐतिहासिक कादंबऱ्यातील नायकनायिकांच्या संवादात इतिहास थोडा व कल्पनाच जास्त असला प्रकार आहे. त्यामुळे कथा–कादंबऱ्यांना स्पर्शही न करता ही थोरल्या माधवरावाच्या जीवनाची सत्यकथा मी लिहिलेली आहे.

(२० सप्टेंबर २००७) **श. श्री. पुराणिक**





## ऋणनिर्देश


| | | | |
|---|---|---|---|
| १. | मराठी रियासत मध्यविभाग ४ | – | गो. स. सरदेसाई |
| २. | थोरले माधवराव पेशवे | – | स. अ. सहस्त्रबुद्धे |
| ३. | Fall Of the Mogal Empire | - | J. N. Sarkar Vol III |
| ४. | पेशवे दप्तर – माधवराव – गारदि | | |
| ५. | पेशवे दप्तर – माधवराव कर्नाटक स्वाऱ्या | | |
| ६. | पेशवे दप्तर – माधवराव रघुनाथरावांचा विरोध | | |
| ७. | पेशवे दप्तर – माधवराव राज्यकारभार | | |
| ८. | इतिहासातील सहली भाग २ | – | य. न. केळकर |
| ९. | सखारामबापू बोकील | – | य. य. कनिटकर |
| १०. | राघौ भरारी | – | वा. रं. सुठणकर |
| ११. | मुखपृष्ठावरील चित्र | – | राजा दिनकर केळकर संग्रहालयाच्या सौजन्याने. |


***

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | माधवरावास पेशवे पदप्राप्ति | ५ |
| २. | श्रीमंत तीर्थरूप दादासाहेब पेशवे – घोडनदी | १४ |
| ३. | निजाम : राक्षस भुवन | ३९ |
| ४. | हैदरअली : कर्नाटक | ५० |
| ५. | पुन्हा एकदा दादासाहेब | ६९ |
| ६. | तोतयाचे बंड | ८४ |
| ७. | छत्रपती : सातारा व कोल्हापूर | ९४ |
| ८. | नागपूर : जानोजी भोसले | १०० |
| ९. | उत्तरहिंद – पानिपतचा सूड | १०५ |
| १०. | व्यक्तिदर्शन | ११९ |
| ११. | अखेर – १८ नोव्हेंबर १७७२ | १३० |




– १ –

# माधवरावास पेशवे पदप्राप्ति

### ब्राह्मण पेशव्याचा मुसलमान मामा!

माधवरावाचा जन्म दि. १६ फेब्रुवारी १७४५ रोजी कर्नाटकात सावनूर येथे, सावनूरच्या नवाबाच्या घरी झाला. त्याच्या जन्माची एक कथा आहे व ती जरा मजेदार आहे. माधवराव हा पदवीनेच नव्हे, तर परमार्थानेही श्रीमंत असलेल्या श्रीमंत नानासाहेब पेशवे व गोपिकाबाई यांचा दुसरा पुत्र होय. त्या अर्थाने तो जन्मतःच गर्भश्रीमंत होता. तो गर्भात असताना नानासाहेब पेशवे हे कर्नाटकात मुलुखगिरीवर होते. कर्नाटकातल्या शिरेहोसकोटेअर्काट येथील मुसलमान नवाबांपासून खंडणी गोळा करीत ते सावनूरला आले. त्यांच्या सौभाग्यवती गोपिकाबाई नेहमीच्या प्रथेप्रमाणे स्वारीतही त्यांच्याबरोबर होत्या. त्यांचे दिवस भरले. पेशव्यांचे व कर्नाटकातल्या नवाबांचे संबंध राजकारणाचा व खंडणीचा संबंध जमेस धरून सुद्धा फार स्नेहाचे होते. तेव्हा त्यांनी आसन्नप्रसवा गोपिकाबाईला सावनूरच्या नवाबाकडे ठेवले व ते पुढे पुण्याला गेले. गोपिकाबाई प्रसूत झाल्यावर बाळ–बाळंतिणीचे नवाब साहेबांनी घरच्यासारखे अगत्य केले व त्यांच्या इच्छेप्रमाणे बाईस वस्त्रालंकार व मुलास बाळलेणी देऊन आपल्या माणसांबरोबर मोठ्या इतमामाने पुण्यास रवाना केले. पुढे मुलाचे नाव माधवराव ठेवले. सावनूरच्या नवाबसाहेबांनी, आपल्या बालवयातच, आपला जो प्रतिपाल केला, त्याबद्दल माधवराव मोठेपणी ही त्यांस आपला मामा असेच समजत असे.

### बालपणीचा काळ सुखाचा!

माधवरावाचे बालपण फार ऐश्वर्यात व सुखात गेले. नोकरा–चाकरांनी गजबजलेला शनिवारवाडा, विश्वासरावांसारखा थोरला व नाराणरावासारखा धाकटा भाऊ, नानासाहेबासारखा बाप, गोपिकाबाईंसारखी आई, भाऊसाहेब व रघुनाथराव